# महाराष्ट्रात जहाज बांधणी, जहाज दुरुस्ती आणि जहाज पुनर्वापर धोरण-२०२५

---

महाराष्ट्र राज्याच्या किनारपट्टीवर जहाज बांधणी, जहाज दुरुस्ती आणि जहाज पुनर्वापर सुविधा स्थापित करण्यासंदर्भातील धोरणास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. परदेशी जहाजांवरील अवलंबित्व कमी करणे, सागरी वाहतूक, ऊर्जा सुरक्षा तसेच राष्ट्रीय संरक्षणात स्वावलंबन वाढविणे, देशाबाहेर जाणारा परकीय चलनाचा ओघ कमी करणे व देशाच्या परकीय गंगाजळीत वाढ करणे, मेक-इन-इंडिया कार्यक्रम व लघु-मध्यम उद्योगांना प्रोत्साहित करणे आणि मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण करणे असे बहुविध उद्देश साध्य करण्यासाठी शासनाने हे धोरण आणले आहे.

केंद्र शासनाच्या महत्वाकांक्षी मेरीटाईम इंडिया व्हीजन-२०३० आणि मेरीटाईम अमृत काल व्हीजन-२०४७ या कार्यक्रमामध्ये जहाजबांधणी, जहाजदुरुस्ती व जहाज पुनर्वापर यासाठी निश्चित करण्यात आलेल्या लक्ष्यापैकी १/३ वाटा उचलण्याचे उद्दीष्ट प्रस्तुतच्या धोरणाव्दारे ठेवण्यात आले आहे. ह्या धोरणांतर्गत, सागरी शिपयार्ड क्लस्टर्स, एकल शिपयार्ड आणि विद्यमान/आगामी बंदरांमध्ये शिपयार्ड प्रकल्प अशा तीन मॉडेलव्दारे विकास करण्याचे ठरविण्यात आले असून, त्यामध्ये खाजगी क्षेत्राच्या सहभागासाठी प्रोत्साहन देण्यात येणार आहे. प्रकल्पासाठी रस्ते, रेल्वे आणि पाणी, वीज यासारख्या सुविधा शासनामार्फत उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

ह्या धोरणांतर्गत, प्रकल्प किंमतीच्या १५% भांडवली अनुदान, कौशल्य सुविधा उभारण्यासाठी प्रकल्प खर्चाच्या ६०% किंवा रु. ५ कोटी यापैकी जे कमी असेल ते अनुदान, कर्मचाऱ्यांच्या कौशल्य विकासावरील खर्चाच्या ५०% किंवा १ कोटी रुपये, यापैकी जे कमी असेल ते अनुदान तसेच संशोधन आणि विकास सुविधा खर्चाच्या ६०% किंवा ५ कोटी रुपये, यापैकी जे कमी असेल ते अनुदान देण्यात येणार आहे.

देशाच्या औद्योगिक व आर्थिक प्रगतीमध्ये महाराष्ट्राला अग्रेसर बनविण्यासाठी व मोठ्या प्रमाणात रोजगार व पूरक उद्योग निर्मितीसाठी शिपयार्ड क्षेत्राला प्रोत्साहन देणे अत्यंत गरजेचे आहे. गुजरात, आंध्रप्रदेश, तामीळनाडू इ. प्रतिस्पर्धी किनारी राज्यांमध्ये स्वतंत्र शिपयार्ड धोरण तयार करीत आहेत. या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्रामध्ये जहाज बांधणी, जहाज दुरुस्ती व जहाज पुनर्वापर याबाबतच्या धोरणास मान्यता देऊन, शासनाने ह्या क्षेत्रात महाराष्ट्राला अग्रेसर बनविण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.